पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा. शिक्षण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ०६

**सभावृत्तांत**

दिनांक – **०४/०२/२०२१** वेळ - **दुपारी २.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची पाक्षिक सभा **गुरुवार** दिनांक **०४/०२/२०२१** रोजी दुपारी **२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालीलप्रमाणे सन्मा.सदस्य सभागृहात उपस्थित होते.

१. **मा.पवार मनिषा प्रमोद - सभापती**
२. मा.बारसे प्रियांका प्रविण
३. मा.बारणे माया संतोष
४. मा.कामठे तुषार गजानन
५. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
६. मा.भाऊसाहेब सोपान भोईर
७. मा.वाघमारे अश्विनी विक्रम

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-------------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१) निषेध नोंदविण्याबाबत.- मा.प्रियांका बारसे, मा.तुषार कामठे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२) बालवाडी वर्ग खोलीचे आधुनिकीकरण करणेबाबत.- मा.प्रियांका बारसे, मा.अश्विनी वाघमारे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) सुसज्ज विज्ञान प्रयोगशाळा तयार करणेबाबत. – मा.प्रियांका बारसे, मा.तुषार कामठे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) मनपा शाळांमध्ये सॅनिटरी नॅपकिन व्हेंडींग मशीन व डिस्पोजेबल मशीन बसविणेबाबत.- मा.प्रियांका बारसे, मा.अश्विनी वाघमारे यांचा प्रस्ताव.

विष्य क्र.५) मनपा शाळांमध्ये Automatic हॅन्ड सॅनिटायजर मशीन बसविणेबाबत.- मा.प्रियांका बारसे, मा.अश्विनी वाघमारे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) मनपा शाळेतील मैदानावर ओपन जीम तयार करणेबाबत.- मा.प्रियांक बारसे, मा.तुषार कामठे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७) मौजे ताथवडे येथील जि.प.शाळा मनपाकडे वर्ग करणेबाबत.- मा.प्रियांका बारसे, मा.तुषार कामठे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८) मनपा शाळेच्या इमारतीचे फायर ऑडिट,इलक्ट्रिकल स्ट्रक्चर ऑडिट,हायजिन ऑडिट करणेबाबत.- मा .प्रियांका बारसे, मा.तुषार कामठे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.९) मनपा शाळेत प्रिंटरसाठी प्रत्येकी तीन टोनर खरेदीबाबत. – मा.प्रियांका बारसे, मा.अश्विनी वाघमारे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१०) प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना वाहतुक सुविधा पुरविणेबाबत.-मा.भाऊसाहेब भोईर, मा.अश्विनी वाघमारे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.११) पिं.चिं.मनपा सर्व प्राथमिक शाळांमध्ये स्वरधरा संस्थेमार्फत संगीत शिक्षण ऑनलाईन पध्दतीने चालू करणेबाबत.- मा.प्रियांका बारसे, मा.अश्विनी वाघमारे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१२) पिं.चिं.मनपा प्राथमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांकरिता ज्ञानरचनावादी शिक्षण पध्दतीचा वापर करणेबाबत. – मा.प्रियांका बारसे, मा.भाऊसाहेब भोईर यांचा प्रस्ताव.

--------------

अ) दिनांक २१/०१/२०२१ रोजी झालेल्या **सभेचा** (कार्यपत्रिका क्रमांक **०५** ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------------

( पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षाकरिता गणवेश ,पी.टी.गणवेश,स्वेटर मा.उच्च न्यायालय,मुंबई यांनी आदेश दिल्यानतरही मा.आयुक्त यांनी सदरच्या नस्तीवर मान्यता दिलेली नाही. शाळा सुरु होण्याकरिता दोन दिवस बाकी असताना देखील आपणामार्फत विद्यार्थ्यांना शालेय गणवेश ,पी.टी.गणवेश व स्वेटर वाटपाच्या आदेशावर कोणताही निर्णय घेतलेला अद्याप दिसत नाही. दरवेळी वर्तमानपत्रात विद्यार्थ्यांना पहिल्या दिवशी शालेय साहित्य मिळत नसल्याबाबत वर्तमानपत्रात शिक्षण विभागाची नाहक बदनामी होत असते. ह्या वर्षी सन २०२०-२१ करिता मा.उच्च न्यायालय,मुंबई यांनी दिनांक १८/०१/२०२१ रोजी प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय गणवेश पी टी गणवेश व स्वेटर वाटप करण्याबाबत आदेश दिलेले असताना देखील कोणतीही कार्यवाही का करण्यात येत नाही? तसेच शहरातील गोर-गरीब विद्यार्थ्यांबाबतीत अन्यायाची भूमिका का घेत आहात? तसेच शालेय गणवेश, पी.टी.गणवेश व स्वेटर वाटपास उशीर होत असल्यास यास सर्वस्वी जबाबदार प्रशासन असेल? तरी सन २०२०-२१ शैक्षणिक वर्षाकरिता मा.उच्च न्यायालय,मुंबई यांचे गणवेश, पी.टी.गणवेश, स्वेटर वाटपाचे आदेश असताना देखील मा.आयुक्त यांनी मान्यता दिली नसल्याने त्याचा निषेध नोंदविण्यात येत आहे.)

-------------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक -२५ विषय क्रमांक -०१

दिनांक - ०४/०२/२०२१

सुचक : मा.प्रियांका बारसे अनुमोदक : मा.अश्विनी वाघमारे

संदर्भ : मा.प्रियांका बारसे, मा.अश्विनी वाघमारे यांचा प्रस्ताव.

प्राथमिक शिक्षण विभागाकडील शाळांमधील बालवाडीचे एक वर्गखोली प्रायोगिक तत्वावर अपग्रेडेशन (आधुनिकीकरण) करणेबाबत नियोजित आहे. सदर वर्गखोली मध्ये क्लासरुम २०x२० असुन लहान मुलांना वर्गाचे आकर्षण निर्माण होईल, वर्गखोलीचे रंगसंगती, वातावरण,सुसज्ज अशा प्रकारे असावी, यामध्ये वर्गाची पीओपी,पेटींग करणे,नव्याने प्लोरिंग करणे, वर्गखोलीचे वातावरण लहान मुलांना आवडेल असे चांगले व सुसज्ज करणे, मोडयुलर स्टोअरेज करणे,विद्यार्थ्यांची पुस्तके,खेळणी,डब्बे,बॅग इ. ठेवणेकामी व्यवस्थित जागा, रॅक करणे, शिक्षकांसाठी टेबल,खुर्ची,व्यवस्था सुसज्ज अशी नव्याने आकर्षित रंगसंगतीसह वर्गखोली प्रायोगिक तत्वावर निर्माण करणे वरीलप्रमाणे कामकाजासाठी प्रायोगित तत्वावर नव्याने १ बालवाडी वर्गखोली प्रायोगिक तत्वावर अधुनिकीकरण करण्याकामी र.रु.३,५०,०००/-(अक्षरी र.रु.तीन लाख पन्नास हजार फक्त) खर्च येणार आहे. तरी प्रायोगिक तत्वावर १ बालवाडी वर्गखोलीचे अधुनिकीकरण करणेकामी मे.रेखा इंजिनिअरींग यांचेकडून कामकाज थेटपध्दतीने करुन घेण्यास त्याच अनुषंगाने तीन शाळा १) भोसरी प्राथमिक शाळा २) कासारवाडी प्राथमिक शाळा ३) मोशी प्राथमिक शाळा

करण्यात करणेकामी तसेच याकामी होणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कामय होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समितीसभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२६ विषय क्रमांक - ०२

दिनांक - ०४/०२/२०२१

सुचक : मा.प्रियांका बारसे अनुमोदक : मा.तुषार कामठे

संदर्भ : मा.प्रियांका बारसे, मा.तुषार कामठे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व शाळांमध्ये बहुतेक शिक्षण घेणार विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात. आपल्या महानगरपालिकेतील शाळेचा दर्जा खाजगी शाळेंच्या प्रमाणे करण्यासाठी विद्यार्थ्यांमध्येही शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरीता तसेच मनपा शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करणेकरिता व मनपा शाळेची पट संख्या वाढविणेकरिता शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे. त्याच अनुषंगाने सर्व प्राथमिक शाळेतील इयत्ता ५ वी ते ८वीतील विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज विज्ञान प्रयोग शाळा तयार केल्यास त्याचा अभ्यासाठी उपयोग होईल तसेच त्यांच्या ज्ञानामध्ये वाढ होईल. तरी याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीसभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २७ विषय क्रमांक - ०३

दिनांक - ०४/०२/२०२१

सुचक : मा.प्रियांका बारसे अनुमोदक : मा.अश्विनी वाघमारे

संदर्भ : मा.प्रियांका बारसे, मा.अश्विनी वाघमारे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक शाळांमध्ये बहुतेक शिक्षण घेणार विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात. आपल्या महानगरपालिकेतील शाळेचा दर्जा खाजगी शाळेंच्या प्रमाणे करण्यासाठी विद्यार्थ्यांमध्येही शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरीता तसेच मनपा शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करणेकरिता व मनपा शाळेची पट संख्या वाढविणेकरिता शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या आरोग्यकडेही लक्ष देणे आवश्यक आहे. मनपा विद्यार्थ्यांनींच्या आरोग्याच्या दृष्टीने मासिक पाळी दरम्यान वापरल्या जाणा-या पॅड वापराचे प्रमाण अत्यल्प आहे. पॅड वापरायचे प्रमाण खुपच कमी आहे. त्यामुळे हे प्रमाण वाढविण्यासाठी तसेच वापरल्या जाणा-या पॅडचे विघटन होण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे. सॅनिटरी नॅपकिन व्हेंडींगच्या वापरातून अल्प दरात उत्तम दर्जाचे नॅपकिन उपलब्ध करुन घेता येईल. त्यामुळे ग्रामीण व शहरी भागात पॅड वापराचे प्रमाण वाढविण्यासाठी मदत होईल. व नॅपकिन विघटनाची नियोजन सॅनिटरी नॅपकिन डिस्पोजल मशिनमार्फत करणेकामी मशीन खरेदी करिता येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहाता सदर ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८ विषय क्रमांक - ०४

दिनांक - ०४/०२/२०२१

सुचक : मा.प्रियांका बारसे अनुमोदक : मा.अश्विनी वाघमारे

संदर्भ : मा.प्रियांका बारसे, मा.अश्विनी वाघमारे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका महाराष्ट्रातील विकासाभिमुख काम करण्यासाठी नेहमीच कार्यशील असते. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमातून आजपर्यंत वेगवेगळे उपक्रम राबविल्याचे दिसून येते यातून प्रेरणा घेवून महिला आरोग्य व सार्वजनिक स्वच्छता या विषयावर काम करण्यासाठी अभिनव संकल्पना वापरून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमातून पालिकेच्या शिक्षण विभागा अंतर्गत असणा-या सर्व पालिकेतील विद्यार्थ्यांच्या आरोग्या दृष्टीने Covid-19 च्या पार्श्वभूमीवर स्वयंचलित (Automatic) हॅन्ड सॅनिटायझर मशीन ही नवीन संकल्पना सादर करणेस मान्यता देण्यास व पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत एकूण ६५२ माध्यमिक व उच्च् माध्यमिक शाळा आहेत. त्यात काही खाजगी व अनुदानित व विनाअनुदानित शाळांची संख्या आहेत. एकंदरीत पिं.चिं.मनपा पालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक असे दोन्हीही मिळून १२८ शाळा आहेत. पिं.चिं.मनपा प्राथमिक शाळा संख्या ११० असून यामध्ये एकूण वर्ग खोल्यांची संख्या ११२६ असून त्यामध्ये असणा-या स्वच्छतागृहांची संख्या देखील ८९७ असून या ठिकाणी (Automatic) हॅन्ड सॅनिटायजर मशीन बसविता येईल. जेणेकरून विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेता येईल. पि.चि.म न.पा. माध्यमिक शाळांची संख्या १८ असून या यामध्ये एकूण वर्गखोल्यांची संख्या २४३ आहेत त्यामध्ये असणा-या स्वच्छतागृहांची संख्या २५१ असून या ठिकाणी देखील (Automatic) हॅन्ड सॅनिटायजर मशीन बसविणे गरजेचे आहे.

| | शाळांची संख्या | वर्गखोल्यांची संख्या | स्वच्छतागृहांची संख्या |
|---|---|---|---|
| प्राथमिक | ११० | ११२६ | ८९७ |
| माध्यमिक | १८ | २४३ | २५१ |
| **एकूण** | **१२८** | **११४८** | **१३६९** |

वरील आकडेवारी विचारात घेता प्राथमिक व माध्यमिक शाळेतील वर्गखोल्यांमध्ये व स्वच्छतागृहांमध्ये (Automatic) हॅन्ड सॅनिटायजर मशीन बसविल्यास “COVID 19 “ या रोगाचा सामना करताना पालिकेतर्फे चांगली व्यवस्था करता येईल व शाळेत शिकणा-या विद्यार्थ्यांचे आरोग्य जपता येईल. तरी याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीसभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समितीसभेकडे पाठविणे यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९ विषय क्रमांक - ०५

दिनांक - ०४/०२/२०२१

सुचक : मा.प्रियांका बारसे अनुमोदक : मा.तुषार कामठे

संदर्भ : मा.प्रियांका बारसे, मा.तुषार कामठे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक शाळांमध्ये बहुतेक शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात. महानगरपालिकेतील शाळेचा दर्जा खाजगी शाळेच्याप्रमाणे करण्यासाठी, विद्यार्थांमध्येही शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरिता तसेच मनपा शाळेतील विद्यार्थांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्याकरिता व मनपा शाळांची पटसंख्या वाढण्याकरिता शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे.

तसेच विद्यार्थांच्या आरोग्याकडेही लक्ष देणे आवश्यक आहे. त्याच अनुषगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळेतील मैदानामध्ये ओपन जिम उभारण्यात आल्या तर विद्यार्थाच्या मानसिक व शारीरीक आरोग्यावर त्याचा चांगला परिणाम यादृष्टीने सर्व प्राथमिक शाळेतील मैदानामध्ये ओपन जिम उभारणेकामी मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३० विषय क्रमांक - ०६

दिनांक - ०४/०२/२०२१

सुचक : मा.प्रियांका बारसे अनुमोदक : मा.तुषार कामठे

संदर्भ : मा.प्रियांका बारसे, मा.तुषार कामठे यांचा प्रस्ताव.

मौजे ताथवडे या गावाचा गावठाणासहित पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात समावेश झाल्याने तेथील जिल्हा परिषद शाळा शिक्षण विभाग पिंपरी चिंचवड महानगरपालिकाकडे वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कामय होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३१ विषय क्रमांक - ०७

दिनांक - ०४/०२/२०२१

सुचक : मा.प्रियांका बारसे अनुमोदक : मा.तुषार कामठे

संदर्भ : मा.प्रियांका बारसे, मा.तुषार कामठे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शाळेमध्ये शहरातील अनेक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. महानगरपालिकेतील शाळेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थांच्या सुरक्षितेची काळजी घेणे गरजेचे आहे.भविष्यामध्ये कोणत्याही प्रकारची दुर्घटना होऊ नये यासाठी सर्व शाळेतील इलेक्ट्रियल, स्ट्रक्चरल ऑडिट, हायजिन ऑडिट करणे आवश्यक आहे. तसेच गेली वर्षभर मनपाच्या सर्व शाळा बंद आहेत ही महत्वाची बाब लक्षात घेऊन महानगरपालिकेच्या संबंधित विभागामार्फत त्वरित सर्व शाळेतील इलेक्ट्रियल, स्ट्रक्चरल ऑडिट, हायजिन ऑडिट करून घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३२ विषय क्रमांक - ०८

दिनांक - ०४/०२/२०२१

सुचक : मा.प्रियांका बारसे अनुमोदक : मा.अश्विनी वाघमारे

संदर्भ : मा.प्रियांका बारसे, मा.अश्विनी वाघमारे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळेंमध्ये प्रिंटर आहेत सदर प्रिंटरसाठी १ टोनर देण्यात आलेला होता. सदरचा टोनर शालेय कामकाजाकरिता वापरण्यात आल्याने संपलेला आहे तरी शालेय कामकाजाकरिता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळातील प्रिंटरसाठी प्रत्येकी ३ टोनर खरेदी करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कामय होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३३ विषय क्रमांक - ०९

दिनांक - ०४/०२/२०२१

सुचक : मा.भाऊसाहेब भोईर अनुमोदक : मा.अश्विनी वाघमारे

संदर्भ : मा.भाऊसाहेब भोईर, मा.अश्विनी वाघमारे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागातील ग्रामीण भागातील,विटभट्टी कामगारांची मुले यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी विदयार्थी वाहतुक बस सुविधा सुरु करण्यात आली होती. त्याअनुषंगाने मे.प्रेम टुर्स ॲण्ड ट्रव्हर्ल्स, च-होली यांना निविदा नोटीस क्र.२४/२०१९ अन्वये आठ प्राथमिक शाळेतील विदयार्थी वाहतुक बस सुविधा पुरविणेचे एप्रिल-२०२० पर्यंत कामाचे आदेश दिले होते. परंतु भारतामध्ये कोरोना संसर्गजन्य रोग प्रादुर्भाव झाल्याने मार्च-२०२० पासून पिंपरी चिंचवड शहरामध्ये लॉकडाऊन लागू करण्यात आले. शाळा बंद झाल्याने त्यांचे काम देखील बंद करण्यात आले आहे. सदयस्थितीमध्ये महाराष्ट्र राज्य शासनाच्या शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या आदेशान्वये व पिं.चिं.मनपाचे मा. आयुक्त यांच्या आदेशान्वये दि. ४/०२/२०२१ पासून इयत्ता ५ वी ते ८ वी पर्यंतच्या शाळा सुरु होणार असून मे. प्रेम टुर्स ॲण्ड ट्रव्हर्ल्स यांनी सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षाच्या उर्वरित कामाचे कालावधीसाठी मागील मंजूर दराने निविदा क्र. २४/२०१९ च्या अटी-शर्ती, करारनामा व मंजूर दरानुसार काम करण्यास तयार असून कामाचे आदेश देणेकामी पत्राद्वारे विनंती केली आहे. तसेच शाळेच्या मुख्याध्यापक यांनी विदयार्थी बस सुविधा पुरविणे बाबत मागणी केली आहे. त्याअनुषंगाने मे. प्रेम टुर्स ॲण्ड ट्रव्हर्ल्स, च-होली यांना कामाचा अनुभव, माहिती असल्याने नवीन शैक्षणिक वर्ष सन २०२१-२२ सुरु होईपर्यंत. नव्याने निविदा न काढता पुर्वीच्या निविदा क्र.२४/२०१९ च्या अटी-शर्ती, करारनामा व मंजूर दरानुसार फक्त निविदेमध्ये मंजूर असलेल्या शाळेतील इयत्ता ५ वी ते ८ वी च्या विदयार्थी-विदयार्थीनीकरीता १) कै.बबनराव भोंडवे प्राथमिक शाळा, रावेत २) कै. दिलीपराव ढवळे प्राथमिक शाळा मुले/मुली, पुनावळे शाळा क्र. १०३, ३) सावित्रीबाई फुले मुले/कन्या प्राथमिक शाळा क्रमांक १०६ मोशी ४) पिं.चिं.मनपा प्राथमिक शाळा चोविसावाडी शाळा क्र.२१ चोविसावाडी ५) महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक शाळा, यशवंतनगर ६) छत्रपती श्री. शाहु महाराज प्राथमिक विदयालय दिघी ता. हवेली जि. पुणे या **सहा** शाळेतील विदयार्थी-विदयर्थीनी यांची बस वाहतुक सुविधा पुरविणेचे सन २०१९-२० मधील निविदेतील उर्वरित कालावधीचे कामकाज सन २०२०-२१ मध्ये करण्यास तसेच मे. प्रेम टुर्स ॲण्ड ट्रॅव्हर्ल्स, च-होली यांना विदयार्थी वाहतुकीचे कामास त्यापुढे ३ महिने मुदतवाढ देण्यात येऊन कामाचे आदेश देणेकामी होणारे अंदाजे वाढीव खर्च र.रु. १२,००,०००/-(अक्षरी र.रु.बारा लाख फक्त) चे खर्चास व सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षाचे उर्वरित कालावधीसाठी विदयार्थी वाहतुक सुविधा चालू ठेवण्यास नव्याने निविदा प्रकिया करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कामय होणेची वाट न पाहात सदर ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३४ विषय क्रमांक - १०

दिनांक - ०४/०२/२०२१

सुचक : मा.प्रियांका बारसे अनुमोदक : मा.अश्विनी वाघमारे

संदर्भ : मा.प्रियांका बारसे, मा.अश्विनी वाघमारे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक शाळांमध्ये बहुतेक शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात. महानगरपालिकेतील शाळेचा दर्जा खाजगी शाळेच्याप्रमाणे करण्यासाठी, विद्यार्थांमध्येही शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरिता तसेच मनपा शाळेतील विद्यार्थांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्याकरिता व मनपा शाळांची पटसंख्या वाढण्याकरिता शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे.

त्याच अनुषगाने विद्यार्थीच्या कला गुणांना वाव देण्याचे कामकाज शिक्षण समिती करण्याचे दृष्टीने स्वरधरा संस्थेमार्फत संगीत शिक्षण – प्रयोगिक तत्वावर ऑनलाइन पद्धतीने सुरु करणे आवश्यक आहे. सदर बाबतीत संस्थेने विभागास प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर उपक्रम राबविल्यास विद्यार्थीना त्यांचा फायदा होईल.

1) **सर्व विद्यार्थ्यांना APP उपलब्ध करून देणे**

   APP गूगल प्ले स्टोर वर उपलब्ध आहे. त्याचे संकेत स्थळ सर्व विद्यार्थ्यांना देण्यात येईल.APP डाऊनलोड केले की त्यातील वॉल्यूम 1 वापरुन पहिल्या वर्षाचे शिक्षण मुलांना घ्यायचे आहे. वॉल्यूम 1 मिळण्यासाठी प्रत्येक मुलाला एक कोड दिला जाईल. त्या कोड च्या आधारे वॉल्यूम 1 माधिले अभ्यासक्रम खुला होऊन विद्यार्थ्यांना धड्याच्या रूपाने पुस्तकाची पाने आणि स्वर-ताल बद्धं ध्वनि मुद्रण मिळेल.

2) **सध्याच्या मनपा संगीत शिक्षकांना APP मधील अभ्यासक्रम समजावून सांगणे**

   शिक्षकाना संपूर्ण अभ्यासक्रम आणि धडे समजावून सांगण्यात येईल. एका ऑनलाइन मीटिंग आणि ट्रेनिंग द्वारे. संगीत त्यांना येतच आहे, प्रत्येक धड्यातील मुद्दे आणि ते मुलांकडून करून घेण्याची पद्धत आपण ह्या मीटिंग मध्ये सगळ्या शिक्षकांना समजविण्यात येईल. व काही शंका असल्यास त्याचे निरसन करण्यात येईल. त्या आधारे शिक्षक मुलांना प्रती धडा अर्धा तास लाईव्ह किंवा रेकॉर्ड करून पाठवू शकतील सवडी प्रमाणे बघून शिकायला, मग लाइव्ह ची पण गरज नाही. स्वाध्यायाप्रमाणे मुलांनी तो अभ्यास पूर्ण करून, गरज असेल तसे शिक्षकाना रेकॉर्ड करून पाठवणे सहज शक्य आहे. सदर उपक्रमास स्वरधारा संस्थेने **र.रु.३,००,०००/- (अक्षरी र.रु.तीन लाख फक्त)** इतका खर्च कळविला असून सदर खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कामय होणेची वाट न पाहात सदर ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३५ विषय क्रमांक - ११

दिनांक - ०४/०२/२०२१

सुचक : मा.प्रियांका बारसे अनुमोदक : मा.भाऊसाहेब भोईर

संदर्भ : मा.प्रियांका बारसे, मा.भाऊसाहेब भोईर यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक शाळांमध्ये बहुतेक शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात. महानगरपालिकेतील शाळेचा दर्जा खाजगी शाळेच्याप्रमाणे करण्यासाठी, विद्यार्थांमध्येही शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरिता तसेच मनपा शाळेतील विद्यार्थांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्याकरिता व मनपा शाळांची पटसंख्या वाढण्याकरिता शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे. त्याच अनुषगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळांमध्ये विद्यार्थांकरिता “ज्ञानरचनावादी शिक्षणपद्धतीचा” वापर केल्यास विद्यार्थांना त्याचा चांगला फायदा होईल. ज्ञानरचनावादी शिक्षणपद्धतीमध्ये प्रत्यक्ष अनुभवातून विद्यार्थाना शिक्षण देण्यासाठी आवश्यक असलेले सर्व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. तसेच ज्ञानरचनावादी शिक्षणपद्धतीमध्ये म्हणी,वाक्यप्रचार, चित्र खेळणे, भिंतीचित्रे संवादातून विद्यार्थांना शिक्षण दिले जाते. केंद्र सरकारने “ज्ञानरचनावादी शिक्षणपद्धतीचा ”उल्लेख २००५ च्या राष्ट्रीय शिक्षणक्रम आराखड्याद्वारे सर्वप्रथम तसेच “ज्ञानरचनावादी शिक्षणपद्धतीचा” वापर अध्ययन-अध्यापनात झाला पाहिजे हा आग्रह २००९ च्या शिक्षण हक्क कायदानुसार धरला आहे. तत्ससंबंधीचा २२ जून २०१५ चा शासन निर्णय हा शिक्षक व केंद्रप्रमुख यांच्यावर मुलांच्या शिकण्याची जबाबदारी टाकतो. तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळांमध्ये विद्यार्थांकरिता “ज्ञानरचनावादी शिक्षण पद्धतीचा” वापर केल्यास त्याचा फायदा विद्यार्थांना होईल व त्याची

शिक्षणाची ओढ वाढेल. त्यासाठी ज्ञानरचनावादी सुसज्ज प्रयोगशाळा उभारण्यास व होणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीसभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कामय होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( पवार मनिषा प्रमोद )**
सभापती
शिक्षण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/६१/२०२१
दिनांक : ०५/०२/२००२१

**(उल्हास बबनराव जगताप)**
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.